रे.के.नं.१३२/२०२३
नि.क्र.२६/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.७ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – मिथून विश्वनाथ पाटील

वय – ४२ वर्षे

सध्या नेमणुक – पोलिस हेड कॉन्स्टेबल, उरण पोलिस स्टेशन

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. देशमाने यांच्यामार्फत...**

१. दिनांक ०९.०२.२०२३ रोजी मी बिट मार्शल म्हणून उरण पोलिस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्यादिवशी फौजदार चंद्रहार पाटील यांनी आम्हाला बोलावले व दोन पंच आणायला सांगितले, त्याप्रमाणे आम्ही दोन पंच घेऊन आलो, साहेबांनी पंचांची नावे लिहून घेतली, आणि त्यांना जप्ती पंचनाम्यासाठी जायचे आहे, असे समजावून सांगितले. त्यानंतर पंचांनी होकार दिला. पंचांची नावे साई मढवी व देवा धाडवे असे होते. त्यानंतर आम्ही खाजगी वाहनाने पिरकोन येथे गेलो. आरोपीच्या घराच्या शेजारी त्यांनी असे बोट दाखवले की, दगडाखाली दांडका ठेवलेला आहे, तो तिथून फौजदार चंद्रहार पाटील यांनी जप्त केला आणि त्यानंतर आम्ही परत पोलिस ठाण्यात आलो. मी सदरचा दांडका पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला दांडका

दाखवण्यात आला, तो बरोबर असून त्यास 'वस्तु अ' देण्यात आले आहे. मी आरोपीस ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. अमर पाटील यांच्यामार्फत...</u>**

२. मी दिनांक ०९.०२.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता पोलीस ठाण्यात हजर होतो, सुमारे १०.०० वाजता फौजदार चंद्रहार पाटील यांनी मला सदर गुन्ह्याबाबत बोलावले होते. साहेबांनी सदर घटना आम्हाला सांगितली त्यामध्ये अंदाजे ५ मिनीटे लागली होती. मी स्वत: पंचांना आणण्यासाठी गेलो नव्हतो, मी पंचांना फोन करून बोलवून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही पंच आमची नेहमीचे पंच आहेत, ते दोघे डाउरनगर चे रहिवासी आहेत. माझा फोन केल्याचे अंदाजे १० ते १५ मिनीटांनी ते पंच पोलिस ठाण्यात आले. ते दोन्ही पंच दोन मिनीटांच्या अंतराने मागे पुढे आले. पंच पोलिस ठाण्यात आल्याच्या नंतर साहेबांनी त्यांना अंदाजे ५ ते १० मिनीटे गुन्ह्या संदर्भात माहिती दिली. साहेबांनी जाण्यासाठीचे कागदपत्रे पोलिस ठाण्यात तयार केले. उरणहून पिरकोन येथे जाण्यासाठी अंदाजे २० ते २५ मिनीटे लागतात. घराजवळ गाडी लावून घटनास्थळापर्यंत थोडेसे पायी चालत जावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, दांडका हा घटनास्थळावरून काढला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी घटनास्थळावर जाऊन आम्ही कोणताही पंचनामा केला नाही, हा

पंचनामा आम्ही पोलिस ठाण्यात बसून तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, वस्तु अ दांडका यावर रक्ताचे किंवा मातीचे डाग दिसत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी आजरोजी कोर्टात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

उरण, (एम. एस. काझी)

दिनांक – १२.०६.२०२५ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण